**विशेष दिवाणी दावा क्र.३४/२०१४ मधील नि.१४० खालील आदेश**
**मे.ओगले ग्लास वर्कस लि. वि. विठ्ठल कोल्हटकर वगैरे**

प्रस्तुतचा अर्ज ति–हाईत इसम यांनी त्यांना दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेसाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

ति–हाईत इसम श्री आनंदराव बाळकृष्ण माने हे वादी कंपनीमध्ये दि.१७.१२.१९६९ पासून मिलर म्हणून नोकरीस होते. त्यांना वादी कंपनीने राहणेसाठी जागा दिली असून, त्यांचे पगारातून त्याबाबत रक्कम कपात केलेली आहे. अर्जदार तेथे ३५ वर्षापेक्षा अधिक काळ रहात असून, ग्रामपंचायत विरवडे येथील नमुना नंबर ८ चे उता–यास त्यांचे नावाची नोंद आहे. अर्जदार सदर मिळकतीत रहात असलेबाबत ग्रामपंचायतीने दाखला दिलेला आहे. सदर जागेमध्ये अर्जदाराचे नावे इले.कनेक्शन आहे. तसेच मतदार यादी व रेशनिंग कार्डही आहे. सदर मिळकतीत ति–हाईत इसम यांचे घर असून, सदर घरामध्ये ते आज देखील कुटुंबियासहीत रहात आहेत. सदर मिळकतीचा जुना मिळकत नंबर ४०७/२ असा आहे. अशी परिस्थिती असताना दि.२४.१०.२००२ रोजीचे खरेदीपत्रामध्ये सदर ति–हाईत इसम यांचे नाव नसलेने वादी यांनी त्यांना दाव्याचे कामी पक्षकार केलेले नाही. सदरचा दावा हा ति–हाईत इसम व अन्य प्रतिवादी यांचे घर मिळकतीबाबत असलेने, सदर दाव्याचे कामी ति–हाईत इसम हे आवश्यक पक्षकार आहेत. ति–हाईत इसम हे वादी कंपनीमध्ये कामगार असलेबाबत व घर मिळकतीमध्ये मालक या नात्याने कब्जे वहिवाटीत असलेबाबत आवश्यक ती कागदपत्रे दाखल करुन, मिळकत क्रमांक ८८७ जुना मिळकत नंबर ४०७/२ चे मालक असलेचे सिध्द करणेस तयार आहेत. म्हणून ति–हाईत इसम यांनी त्यांचा हक्क कायदेशीररित्या सिध्द करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र.२५ यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत नसल्याचे कथन केले आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. जुना मिळकत नंबर ४०७/२ मध्ये ति-हाईत इसम हे राहण्यास आहेत. सदर मिळकतीच्या नमुना नंबर ८ च्या उता-यास त्यांचे नावाची नोंद आहे. ३५ वर्षपेक्षा जास्त कालावधीकरीता ते तेथे रहात आहेत. दि.२४.१०.२००२ च्या खरेदीपत्रात ति-हाईत इसम यांचे नाव नमूद नाही. त्यामुळे सदर ति-हाईत इसम हे दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत. तसेच दावा गुणदोषावर चालणेकरीता ति-हाईत इसम यांना दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक आहे. ति-हाईत इसम यांना दाव्याचे कामी सामील केलेस वादी प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषावर निकाली निघणेस मदतच होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. ति-हाईत इसम यांना दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.02.04 13:15:39 +0530

ठिकाण - कराड (जे.जे.माने)

दिनांक - ०३/०२/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड